THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 21ST DECEMBER 1893.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

**समुद्राचे विम्याच्या पालिसी आणि विकरीचीं सर्टिफिकेटें ह्यांच्या संबंधानें सन १८७९चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट ह्याची सुधारणा करण्याबाबद आक्टाचा मसुदा.**

समुद्राचे विम्याच्या पालिसी आणि विकरीचीं सर्टिफिकेटें ह्यांच्या संबंधानें सन १८७९ चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट सुधारणें ज्या अर्थी इष्ट आहे, त्या अर्थी खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

**समुद्राचे विम्याच्या पालिसी.**

१. सन १८७९ चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट ह्याच्या ७ व्या व ८ व्या कलमांच्या दरम्यान खालील कलम दाखल करावें : तें कलम येणेंप्रमाणें :—

*सन १८७९चा आक्ट १ ला ह्याच्या ७व्या व ८व्या कलमांच्या दरम्यान, समुद्राचे विम्याच्या संबंधानें नवीन कलम दाखल करणें.*

*समुद्राचे विम्याच्या पालिसी.*

" ७ अ. (१) सन १८६२ चा व्यापारी लोकांच्या तारवांबाबद आक्ट सुधारण्याविषयीं आक्ट ह्याच्या ९९ व्या कलमांत उल्लेख केलेल्या विम्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही समुद्राचे विम्याचा करार, त्याबद्दल समुद्राचे विम्याच्या पालिसीचा लेख असल्याशिवाय, कायदेशीर होणार नाहीं.

" (२) मुदतीकरितां केलेली कोणतीही समुद्राचे विम्याची पालिसी बारा महिन्यांपेक्षां जास्त मुदतीकरितां करूं नये.

" (३) समुद्राचे विम्याच्या पालिसींत, ती ज्या विवक्षित धोक्याबद्दल, साहसाबद्दल अगर मुदतीबद्दल केली असेल, तो धोका, तें साहस अगर ती मुदत, आणि वर्गणीदारांचीं अगर अंडर-रैटरांचीं नांवें आणि विम्याची रकम अगर रकमा इतक्या गोष्टी निर्दिष्ट केलेल्या असल्यावांचून, ती कायदेशीर होणार नाहीं.

" (४) जेव्हां कोणताही समुद्राचा विमा कोणत्याही सफरीबद्दल अगर सफरीवर केलेला असून मुदतीबद्दलही केलेला असेल, अगर सफरीच्या मुदतीसुद्धां आणखी, तारूं नेमलेल्या ठिकाणीं पोंचून तेथें तें नांगरल्यानंतरच्या तीस दिवसांपलीकडील कोणत्याही

मुदतीस लागू असणारा किंवा ज्यांत अशा कोणत्याही मुदतीचा समावेश होतो असा केलेला असेल, तेव्हां त्या पालिसीवर सफरीबद्दलच्या अगर सफरीवरच्या पालिसीप्रमाणें ड्यूटी पडून, शिवाय, मुदतीबद्दलच्या पालिसीप्रमाणें ही ड्यूटी पडेल."

सन १८७९चा आक्ट १ ला, परिशिष्ट १, याची समुद्राच्या विम्यासंबंधानें सुधारणा.

२. सन १८८८ चा आक्ट १ ला ह्यावरून सुधारलेलें सदहू आक्टाच्या पहिल्या परिशिष्टाचें आर्टिकल ४९ ह्याच्या समुद्राच्या विम्यासंबंधाच्या (अ) ह्या विभागाच्या ऐवजीं खालील मजकूर दाखल करावा :—

| | दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
|---|---|---|
| विम्याची पालिसी. | (अ) (१) कोणत्याही सफरीबद्दल अगर सफरीवर केलेल्या समुद्राच्या विम्याच्या बाबतींत,— | |
| | (१) सलामतीची अगर मोबदल्याची रकम पालिसींत ठरलेल्या विम्याच्या रकमेवर रुपयास दोन आणे अगर दर शेंकडा एक अष्टमांश ह्यापेक्षां जास्त नसेल तेव्हां ... ... ... | ० १ ० |
| | (२) इतर कोणत्याही बाबतींत, पालिसींत ठरलेल्या विम्याच्या रकमेच्या दर हजार रुपयांच्या पुऱ्या रकमेबद्दल आणि हजार रुपयांच्या कोणत्याही अंशाबद्दलही ... ... ... | ० २ ० |
| | (२) मुदतीबद्दल केलेल्या समुद्राच्या विम्याच्या बाबतींत— | |
| | (३) पालिसींत ठरलेल्या विम्याच्या रकमेच्या दर हजार रुपयांच्या पुऱ्या रकमेबद्दल आणि हजार रुपयांच्या कोणत्याही अंशाबद्दलही खालीं सांगितल्याप्रमाणें ड्यूटी पडेलः— | |
| | विमा साहा महिन्यांपेक्षां जास्त मुदतीचा नसेल तेव्हां ... ... ... | ० ३ ० |
| | विमा साहा महिन्यांपेक्षां जास्त मुदतीचा असून बारा महिन्यांपेक्षां जास्त मुदतीचा नसेल तेव्हां... ... ... | ० ६ ० |

## विकरीचीं सर्टिफिकेटें.

सन १८७९ चा आक्ट १ ला, कलम २४, हें विकरीच्या सर्टिफिकेटांस लागू नाहीं.

३. सदहू आक्टाचें कलम २४ हें, त्याच आक्टाच्या पहिल्या परिशिष्टांतल्या १६ व्या आर्टिकलांत सांगितलेल्या कोणत्याही विकरीच्या सर्टिफिकेटास लागू नाहीं व कधींही लागू नव्हतें असें समजावें.

मात्र इतकेंच कीं, ह्या आक्टाच्या सुरुवातीच्या आधीं कोणत्याही कोर्टानें अगर रेव्हेन्यू आफिसरानें दिलेल्या कोणत्याही हुकुमनाम्यास अगर हुकुमास ह्या कलमांतील कोणताही ठराव लागू होणार नाहीं.

४. सदर्हू आक्टाच्या पहिल्या परिशिष्टांत १६ व्या आर्टिकलाच्या तिसऱ्या आसनांत "खरेदीचे पैक्याचे रकमे इतके" ह्या शब्दांनंतर "मात्र" हा शब्द दाखल करावा. सन १८७९ चा आक्ट १ ला, परिशिष्ट १ लें, ह्यावी विकरीच्या सर्टिफिकेटाच्या संबंधानें सुधारणा.

---

## हेतु व कारणें ह्यांचें निरूपण.

ह्या मसुद्याचे उद्देश दोन आहेत. पहिला उद्देश हा आहे कीं, समुद्राचे विम्याच्या पालिसीसंबंधाचा जो स्टांपाविषयीं कायदा हिंदुस्थानांत चालू आहे, त्याचा, घालवेल तेथवर, सन १८९१ च्या स्टांप आक्टावरून ( व्हिक्टोरिया महाराणीच्या कारकीर्दीच्या ५४ व्या व ५५ व्या वर्षांतील चाप्टर ३९, कलमें ९३ व ९४, आणि परिशिष्ट १ ह्यावरून ) संयुक्तराज्यांत जो कायदा चालू झाला आहे त्याशीं मेळ घालावा; आणि दुसरा उद्देश हा आहे कीं, सन १८७९ चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट, परिशिष्ट १, आर्टिकल १६, ह्याचा, त्याच आक्टाच्या २४व्या कलमासंबंधानें विकरीच्या सर्टिफिकेटांच्या बाबतींत कोणता अर्थ होतो तें ठरवावें.

### समुद्राचे विम्याच्या पालिसी.

२ समुद्राचे विम्याच्या पालिसींवर पडणाऱ्या स्टांप ड्युटीचे दर हल्लीं हिंदुस्थानामध्यें इतर देशांपेक्षां जास्त जबर झाले आहेत. ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं, समुद्राच्या विम्याचें जें काम पूर्वी हिंदुस्थानांत होत असे त्यांतलें बरेंच इतर देशीं जाऊं लागलें आहे.

ह्या विषयासंबंधानें कलकत्ता व मुंबई ह्या शहरांतून अर्ज आलेले आहेत, आणि गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांचा असा अभिप्राय आहे कीं, त्या अर्जांमध्यें, समुद्राचे विम्याच्या पालिसींवर पडणाऱ्या स्टांपड्यूटीचे दर कमी करावे अशी जी प्रार्थना केली आहे, तिच्याप्रमाणें साधारणतः करणें जरूर आहे.

### विकरीचीं सर्टिफिकेटें.

३. ह्या दस्तऐवजांसंबंधीं एका प्रश्नाचा लोकांशीं विशेष निकट संबंध आहे; तो प्रश्न हा आहे कीं, किती ऐवजाबद्दल स्टांप ड्युटी घ्यावी. प्रस्तुत ह्या प्रश्नासंबंधानें मतभेद पडलेला आहे: कलकत्ता, मद्रास आणि अलाहाबाद हे कोर्टांचें* एक ह्मणणें पडतें आणि मुंबई हे कोर्टाचें दुसरेंच ह्मणणें† पडतें.

* इं. ला. रि. १० कलकत्ता, ९२.
,, ,, ५ मद्रास, १८.
,, ,, ७ मद्रास, ४२१.
,, ,, १५ अलाहा. १०७.

† इं. ला. रि. ५ मुंबई ४७०.
,, ,, ९ मुंबई ४७
,, ,, १५ मुंबई ५३२.

गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांच्या मतें, ह्या प्रश्नाचा निकाल होईल तितका लवकर झाला पाहिजे, आणि तो निकाल सदर्हू हे कोर्टांपैकीं जास्त हे कोर्टांचें जसें ह्मणणें पडतें तसा होऊन, तो, साध्य असेल तेथवर, पुढील कायद्यास जसा लागू होईल तसा गतकालासही लागू केला पाहिजे. असें मताविषय ज्या हे कोर्टांचें झालें आहे, त्यांचा अभिप्राय लोकांस सर्वस्वीं फायदेशीर असाच आहे.

तारीख २० माहे आक्टोबर सन १८९३.

(सही) डी. बार्बोर.

(True Translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.